मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अग्निशमन व आपत्ती प्रतिबंधक प्रशिक्षण सत्राचा प्रारंभ

## शहराच्या आपत्ती व्यवस्थापन कार्यक्षमता अधिक सक्षम होईल : अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील

**पिंपरी | प्रतिनिधी**

जपान हा जगातील प्रगत देशांपैकी एक देश असून या देशाला खुपदा नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागतो. अशावेळी आपत्ती व्यवस्थापनासाठी तेथे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विविध प्रकारच्या आपत्तींवर जलद प्रतिसाद देऊन प्रभावीपणे नियंत्रण मिळवले जाते. भारतातील भौगोलिक रचनेचा विचार करून पिंपरी चिंचवड शहराचा विस्तार आणि औद्योगिक आस्थापनांची संख्या पाहता जपानमधील आपत्ती व्यवस्थापन पद्धतींमध्ये वापरण्यात येणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाचे आदान प्रदान केल्यास पिंपरी चिंचवड शहराच्या आपत्ती व्यवस्थापन कार्यक्षमता अधिक सक्षम होईल, असा विश्वास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी व्यक्त केला.



पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत उद्भवणाऱ्या नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींवर जलद तसेच प्रभावीपणे नियंत्रण कसे मिळवावे याबाबत जपानमधील आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी कार्य करणा-या स्थानिक प्राधिकरण परिषदेच्या सिंगापूर प्रतिनिधी कार्यालयाच्या वतीने महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या १३ जानेवारी ते १७ जानेवारी अशा ५ दिवसीय अग्निशमन व आपत्ती प्रतिबंधक प्रशिक्षण सत्राचा प्रारंभ आज झाला. या प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्‌घाटन जांभळे पाटील याच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

चिंचवड येथील ऑटो क्लस्टर प्रदर्शन केंद्र या ठिकाणी पार पडलेल्या या कार्यक्रमास औंध कॅम्पच्या ३३० इन्फट्री ब्रिगेडचे कर्नल नितीन रुमाले, एन. डी. आर. एफ चे कमांडंट संतोष सिंह, सिंगापूर येथील जे क्लेर संस्थेचे कार्यकारी संचालक ताकानो, विशेतज्ञ शिओमी, वरिष्ठ उपसंचालक नागता, उपसंचालक सुश्री कोबायाशी, साकामोटो, वरिष्ठ संचालक सीआऊ यांच्यासह महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी नीलकंठ पोमण, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता संजय खाबडे, बाबासाहेब गलबले, देवन्ना गट्टूवार, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, उपआयुक्त मनोज लोणकर, राजेश आगळे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड तसेच अग्निशमन विभागासह विविध विभागांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड औद्योगिक नगरी दिवसेंदिवस वाढत चालली असून या शहरात उद्भवणा-या आपत्तींवर नियंत्रण मिळविणे हे मोठे आव्हान आहे, असे नमूद करून जांभळे पाटील म्हणाले, जपानी तंत्रज्ञानाची आणि आपत्ती व्यवस्थापन हाताळणीची माहिती प्रशिक्षणाच्या माध्यमातून होत आहे. जपानमधील आपत्ती व्यवस्थापन प्रणाली हे समन्वयाचे एक उत्तम उदाहरण आहे. पिंपरी चिंचवड शहरात उद्भवणाऱ्या आपत्तीला सामोरे जात असताना आपत्ती व्यवस्थापन हे फक्त अग्निशमन विभागाकडील कार्य नसून हे सर्व यंत्रणांनी समन्वयाने परिस्थिती हाताळण्याचे व्यवस्थापन आहे. आपत्ती व्यवस्थापनामध्ये प्रत्येक यंत्रणेची एक महत्वपूर्ण जबाबदारी असते. जपानमधील आधुनिक आपत्ती व्यवस्थापन प्रणालीमधील अत्याधुनिक संकल्पना, प्रतिसाद प्रणाली, प्रारंभिक चेतावणी प्रणाली, तंत्रज्ञानाचा वापर, सामाजिक सहभाग आदी गोष्टींचे अनुकरण केल्यास आपल्याकडे उद्भवणाऱ्या आपत्तींवर जलद तसेच प्रभावीपणे नियंत्रण मिळविण्यात मदत होईल.

# पीसीईटी आणि सिंगापूर येथील गोविंद होल्डिंग्स यांच्यामध्ये शैक्षणिक सामंजस्य करार

## देशाच्या आणि राज्याच्या आर्थिक विकासाला गती मिळेल : डॉ. आनंद गोविंदालुरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतातील स्टार्टअप्स, एमएसएमई उद्योगांना जागतिक पातळीवरती प्रचंड संधी आहेत. याचा फायदा घेण्यासाठी युवकांनी औद्योगिक विकासाची कास धरावी. यामुळे अनेक रोजगार निर्माण होतील. भारताची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन तर महाराष्ट्राची अर्थव्यवस्था तीन ट्रिलियन डॉलर होण्यासाठी चाकोरी बाहेरच्या कल्पनांना मूर्त स्वरूप देत रोजगार निर्मिती करावी. त्यामुळेच देशाच्या आणि राज्याच्या आर्थिक विकासाला गती मिळेल असे प्रतिपादन गोविंद होल्डिंग्स सिंगापूरचे संस्थापक संचालक आणि समूह कार्यकारी अधिकारी डॉ. आनंद गोविंदालुरी यांनी केले.



आधुनिक विज्ञान – तंत्रज्ञानाचा वापर औद्योगिक, व्यावसायिक क्षेत्रात वाढत आहे. महाराष्ट्रातील नव उद्योजक, व्यावसायिक, स्टार्टअप्स यांना जागतिक पातळीवरील नव्या बदलांची माहिती व्हावी. तसेच या क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा, संवाद साधता यावा या उद्देशाने पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचलित पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयु), गर्जे मराठी ग्लोबल, महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने बालेवाडी येथे 'ग्लोबल एंटरप्रेन्युअर्स कॉन्क्लेव्ह २०२५'चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट आणि गोविंद होल्डिंग्स, सिंगापूर यांच्यामध्ये शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला. पीसीईटीच्या वतीने कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी आणि या करारावर गोविंद होल्डिंग च्या वतीने डॉ. गोविंदालुरी यांनी सह्या केल्या.

या शैक्षणिक करारामुळे विद्यार्थी, प्राध्यापकांना जागतिक स्तरावरील उच्च दर्जाचे शिक्षण तसेच उद्योग जगतातील तांत्रिक आणि आर्थिक विषयक माहिती मिळणार आहे. पीसीईटी गुणवत्तापूर्ण दर्जेदार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अभ्यासक्रमामध्ये करत आहे. अल्पावधीतच पीसीईटीने आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार शिक्षण देणारी संस्था म्हणून नावलौकिक प्राप्त केला असून जगातील ३३ पेक्षा अधिक विद्यापीठे, संस्था यांच्याबरोबर शैक्षणिक सामंजस्य करार केले आहेत, असे डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# येरवडा मनोरुग्णालयाला येणार कार्पोरेट लुक!

## संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात लवकरच रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार

**पुणे | प्रतिनिधी**

तब्बल १०० वर्षांपेक्षा जास्त इतिहास असलेले व आशिया खंडातील सर्वात मोठे मनोरुग्णालय अशी बिरुदावली मिरवणारे येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालय आता कात टाकणार असून लवकरच चकचकीत 'कार्पोरेट लुक' धारण करणार आहे. या रुग्णालयाच्या विकासासाठी राज्य सरकारने ११० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली असून या इमारतींची बांधणी व इतर सेवा-सुविधांमध्ये वाढ होणार आहे.




येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालय हे सुरुवातीला १९०७ मध्ये मुंबईतील कुलाब्यात सुरू झाले व नंतर १९१५ मध्ये येरवडा येथील जागेत हलविण्यात आले. अडीच हजार मनोरुग्णांना निवासी राहून उपचार करण्याची क्षमता येथे आहे. ८५ एकर परिसरामध्ये मनोरुग्णालय असून त्यामध्ये बाह्यरुग्ण विभाग, महिला व पुरुष मनोरुग्णांसाठी आठ कक्ष (वॉर्ड) आहेत. तसेच, व्यसनमुक्ती कक्ष व प्रशासकीय कार्यालय आहे. यामध्ये पुरुष, महिला, वृद्ध आणि हिंसक' रुग्णांसाठी स्वतंत्र कक्ष आहेत. तसेच मादक द्रव्यांचे सेवन, स्किझोफ्रेनिया आणि स्वमग्न रूग्ण तसेच वृध्द मनोरूग्णांवर उपचार केले जातात. उपलब्ध जागा भरपूर असली तरी इमारती जीर्ण झाल्या आहेत व त्यांचे श्रेणीवर्धन होणे गरजेचे होते.

**१० कोटी रुपयांची मंजुरी**

या रुग्णालयाला आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी नुकतीच भेट देत पाहणी केली. यावेळी त्यांनी नवीन आराखडा देखील पाहिला.

मनोरुग्णालयाचे बंगळूरूस्थित 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्युरो सायन्सेस' (निम्हान्स) या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या मानसिक आरोग्यावर काम करणाऱ्या संस्थेच्या धर्तीवर नूतनीकरण करण्यात येणार आहे.

**प्रस्तावित रुग्णालयातील सुविधा**

- रुग्णांच्या स्वरूपानुसार महिला व पुरुषांसाठी १२ कक्ष
- प्रत्येक कक्षाला मुख्य प्रवेशद्वार, सुरक्षा केबिन, नर्सिंग कक्ष, डॉक्टर कक्ष
- प्रत्येक कक्षात १०० रुग्णांची क्षमता
- आवारात प्रशस्त रस्ता, पार्किंग, स्वयंपाक घर
- रुग्णांसाठी बगीचा, ध्यानधारणा कक्ष
- रुग्णांच्या कुटुंबीयांसाठी स्वतंत्र कक्ष

त्यासाठी सुरुवातीच्या टप्प्यात १० कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे.

**सध्या रुग्णालयात सुविधा**

१) मनोरुग्णालयात ९३८ रुग्ण असून त्यापैकी ६३१ पुरुष आणि ३०७ महिला

२) पुरुष कक्षाची क्षमता १६०० आणि महिला कक्षाची क्षमता ९४०

३) रुग्णालयातील खाटांची संख्या १,२०० वरून २,५४० पर्यंत वाढवली

४) गेल्या दीड वर्षात ३६१ जणांचे पुनर्वसन

> प्रादेशिक मनोरुग्णालयाचे नूतनीकरण करण्यात येत आहे. सुधारणांचे काम करण्यासाठी प्राथमिक टप्प्यात १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. 'निम्हान्स'च्या धर्तीवर येथे सुविधा तयार होती. पदव्युत्तर मानसोपचार शास्त्राचा अभ्यासक्रम सुरू करून मनुष्यबळ वाढवले जाईल.
> - प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य मंत्री.

# 'मराठी भाषा समन्वय अधिकारी' म्हणून किरण गायकवाड यांची नियुक्ती

## मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार तसेच विकास करण्यासाठी महापालिकेचा पुढाकार

**पिंपरी | प्रतिनिधी**

मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार तसेच विकास करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने पुढाकार घेतला असून आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशान्वये महापालिका स्तरावर विशेष अधिकारी किरण गायकवाड यांची 'मराठी भाषा समन्वय अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



मराठी भाषेच्या अंमलबजावणीसाठी समन्वय अधिका-यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून मराठी भाषा अधिकृत राजभाषा असल्याने महापालिकेच्या वतीने या भाषेचा प्रचार प्रसार विविध स्तरांवर करण्यासाठी 'मराठी भाषा समन्वय अधिकारी' म्हणून जबाबदारी विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यावर सोपविण्यात आली आहे. याबाबतचे स्वतंत्र परिपत्रक महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने निर्गमित करण्यात आले आहे.

मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार, व विकास होण्याच्या अनुषंगाने केवळ शिक्षण व प्रशासकीय कामकाजाचेच नाही तर सर्व लोकव्यवहाराचे जास्तीत जास्त मराठीकरण होणे आवश्यक आहे. त्यासाठी संवाद, संपर्क आणि सर्व स्तरावरील व्यवहारासाठी मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन व्यवहारक्षेत्र निहाय शिफारसी अंतर्भूत असलेले मराठी भाषा धोरण शासनाच्या मराठी भाषा विभागाने दि. १४ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले. त्यानुषंगाने आगामी काळात मराठी भाषा ज्ञान व रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित करणे, विज्ञान-तंत्रज्ञान, वैद्यकीय अशा विविध ज्ञानशाखांमधील उच्च शिक्षण मराठी माध्यमात उपलब्ध करुन देणे, मराठी भाषेला नवतंत्रज्ञानाने सुसज्ज करणे, सर्वसामान्यांना समजेल अशा प्रशासकीय व्यवहाराची मराठी भाषा विकसित करणे, बोली भाषांचे जतन व संवर्धन तसेच मराठी भाषेला राष्ट्रीय व वैश्विक स्तरावर महत्वाची भाषा म्हणून प्रस्तापित करणे आदी उद्दिष्ट साध्य करण्याच्या अनुषंगाने या धोरणामध्ये शिफारसी प्रस्तावित केलेल्या आहेत. मराठी भाषेला आता अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असून मराठीतून कामकाज सक्षमपणे व अधिकाधिक परिणामकारकरित्या करण्यासाठी महापालिका सतत प्रयत्नशील असते. याकरिता प्रत्येक विभागाच्या प्रमुखांना "मराठी भाषा दक्षता अधिकारी" म्हणून नेमण्यात आले आहे.

मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार करण्यासाठी महापालिकेच्या वतीने मराठी भाषेच्या वापरास प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

(पान 1वरून) त्यासाठी हे प्रशिक्षण महत्वाचे ठरणार आहे.

अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर म्हणाले, जपान हा जगातील सर्वात प्रगत आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा असलेला देश असून त्यांच्या दीर्घ अनुभवातून शिकण्याची ही सुसंधी आहे. पिंपरी चिंचवड शहरात दिवसेंदिवस वाढत असलेल्या गृहप्रकल्पासह औद्योगिक आस्थापनांमुळे आपत्ती व्यवस्थापनासमोरील आव्हान वाढत असून त्याचा सामना करण्यासाठी आवश्यक ज्ञान या प्रशिक्षणाच्या माध्यमातून मिळणार आहे. आपत्ती येण्यापूर्वी, आपत्ती काळात आणि आपत्तीनंतर करण्यात येणारे व्यवस्थापन महत्त्वपूर्ण असते. अशावेळी जीवित तसेच वित्त हानी टाळण्याची दक्षता घेणे गरजेचे असते. या पार्श्वभूमीवर प्रशिक्षणाच्या माध्यमातून जपानी तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका हद्दीतील आपत्ती प्रवण क्षेत्रपाहणी करून संभाव्य आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सर्वंकष आराखडा तयार करून नियोजन करण्याचा महापालिकेचा कृतीशील प्रयत्न असेल.

जपानच्या सिंगापूर येथील जे क्लेर संस्थेचे विशेषज्ञ शिआमि आणि कार्यकारी संचालक ताकानो म्हणाले, आतापर्यंत आम्ही विविध प्रकारच्या आपत्तींचे व्यवस्थापन केले आहे. मात्र आम्ही पहिल्यांदाच भारतात आलो आहोत. आपत्कालीन परिस्थिती हाताळत असताना विविध प्रकारची आव्हाने असतात त्यावर मात करून आपत्तीचे यशस्वीरित्या व्यवस्थापन करत असतो. जपानमधील तंत्रज्ञान आणि आपत्ती व्यवस्थापन हाताळण्याची पद्धत याबद्दल माहितीचे आदान प्रदान करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेने आयोजित केलेले प्रशिक्षण निश्चितपणे उपयुक्त ठरेल, असा विश्वास आहे.

दरम्यान, पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन विषयक कामकाजाचे उप आयुक्त मनोज लोणकर, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे माहिती दिली. जपान प्रशिक्षकांनी महापालिका क्षेत्रातील आपत्तीप्रवण स्थळ पाहणी देखील केली.

# नव्या वर्षात वाहन परवाना मिळणे होणार सुलभ

## परिवहन अधिकारी आणि मोटर ड्रायव्हिंग स्कूल असोसिएशनच्या बैठकीत तोडगा

**पिंपरी | प्रतिनिधी**

चाचणी संदर्भात भेडसावणाऱ्या समस्या, चाचणी ठिकाणी आणि ऑनलाइन माध्यमावरील तांत्रिक अडचणी सोडवून नागरिकांना अधिकाधिक सुलभ वाहन परवाना देण्याबाबत प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले. पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयात प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि मोटर ड्रायव्हिंग स्कूल असोसिएशन यांच्यामध्ये झालेल्या बैठकीमध्ये वेगवेगळ्या समस्यांवर तोडगा काढण्यात आला. नव्या वर्षात नागरिकांना अधिकाधिक चांगल्या प्रकारच्या सुविधा देण्याचा मानस आरटीओ अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.




पिंपरी-चिंचवड उप प्रादेशिक कार्यालयाचा दर्जा वाढवून तो प्रादेशिक परिवहन कार्यालय करण्यात आला. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले असून, अधिकारातही वाढ झाली आहे. मात्र, नागरिकांच्या वेगवेगळ्या समस्या अद्याप सुटलेल्या नाहीत. त्यामुळे नव्या वर्षात तरी त्यावर आरटीओकडून सकारात्मक कार्यवाही व्हावी, अशी मागणी न्यू पिंपरी-चिंचवड मोटर ड्रायव्हिंग स्कूल असोसिएशनने केली. यामध्ये ऑनलाइनच्या माध्यमातून येणाऱ्या तांत्रिक समस्या, कासारवाडी येथील आयडीटीआरमध्ये चाचणी संदर्भातील समस्या आणि नागरिकांना करावे लागणारे हेलपाटे यातून मार्ग काढण्याची मागणी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

वाहन परवाना व इतर ऑनलाइन सेवा वापरताना कागदपत्रे अपलोड करावी लागतात. मात्र, कागदपत्र अपलोड करताना अनेक समस्या उद्भवतात. त्यामुळे पुढे शुल्क भरता येत नाही. परिणामी तो अर्ज तसाच पेंडिंग राहतो. त्याचप्रमाणे मुदतबाह्य वाहन परवाना पुन्हा नूतनीकरण करताना आधारकार्ड लिंक होत नाही. त्यामुळे तांत्रिक अडचण निर्माण होते. त्यामुळे वाहन परवाना अधिक लांबतो. या सर्व बाबी तपासून आरटीओच्या माध्यमातून त्यावर तोडगा काढण्याची मागणी या बैठकीत करण्यात आली.

### तीन वेळा तपासणीचा मनस्ताप

» वाहन चाचणीच्या ठिकाणी चाचणीपेक्षा अधिक कागदपत्रे मागवतात. त्यामुळे तपासासाठी भरपूर वेळ लागतो. यामुळे अर्जदारांचा अधिक वेळ खर्ची पडतो. सकाळी साडेनऊ वाजता प्रत्यक्षात कामकाजास सुरुवात होते. मात्र, एका तासानंतर म्हणजे साडेदहा वाजता कागदपत्रांची तपासणी सुरू केली जाते. मात्र त्यापूर्वीच एक ते दीड तास अर्जदारांना ताटकळत थांबवले जाते. विशेष म्हणजे या ठिकाणी तीन वेळा कागदपत्रांची तपासणी केली जाते. यामुळे चाचणीपेक्षा अधिक वेळ इतर कामात खर्ची पडतो.


वाहन चाचणीदरम्यान कासारवाडी येथील आयडीटीआरमध्ये पाण्याची तसेच बसण्याची व्यवस्था करावी, जेणेकरून अर्जदारांना ताटकळत थांबावे लागणार नाही. या ठिकाणी पुणे आणि पिंपरी-चिंचवड या वेगवेगळ्या कार्यालयाची तपासणी होते. मात्र, पुणे आरटीओ अधिकाऱ्यांच्या मार्फत संबंधित अर्जदारांचे पेपर तेथेच मंजूर केले जातात. ती सोय पिंपरी-चिंचवड कार्यालयातही करावी, जेणेकरून अर्जदारांचे पेपर गहाळ होण्याचे प्रमाण कमी होईल. शिकाऊ वाहन परवाना तसेच, पक्के वाहन परवाना या दोन्ही वेळी पडताळणी करण्यासाठी ओरिजनल कागदपत्रांची मागणी करतात. यासाठी अर्जदारांची अनेक वेळा पिळवणूक केली जाते. यावर आरटीओचे प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण यांनी या प्रश्नावर निश्चित तोडगा काढू, असे आश्वासन दिले आहे.

# कचरा टाकून अस्वच्छता करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

## काळेवाडीत अनधिकृत पत्राशेड महापालिकेच्या ग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत पाडकाम

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, अस्वच्छता करणे तसेच व्यावसायिक आस्थापनांमध्ये कचरा संकलनासाठी आवश्यक ती व्यवस्था न ठेवल्यामुळे महापालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत थेरगाव येथे ८ ठिकाणी दंडात्मक कारवाई करण्यात आली असून एकूण ४ हजार रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच पिंपरी, काळेवाडी येथील अनधिकृत बांधकाम आणि पत्राशेडवर पाडकामाची कारवाईदेखील करण्यात आली आहे.



'ग' क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक आरोग्याधिकारी कुंडलिक दरवडे, मुख्य आरोग्य निरीक्षक शशिकांत मोरे, आरोग्य साहाय्यक प्रशांत गोठे, आरोग्य साहाय्यक सचिन उघाडे यांच्यासह विशाल यादव, राजू जगताप, सूर्यकांत चाबूकस्वार, अतिक्रमण विभाग व महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांद्वारे शहरात सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, अस्वच्छता करणे तसेच व्यावसायिक आस्थापनांमध्ये कचरा संकलनासाठी आवश्यक ती व्यवस्था न ठेवल्यामुळे दंडात्मक कारवाई करण्यात आली.

ग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत अतिक्रमण विभागाद्वारे पिंपरी, काळेवाडी-पिंपरी पूल, संजय गांधी नगर, नवमहाराष्ट्र विद्यालयासमोरील परिसर, शिवदत्त नगर, पिंपरी रस्त्यालगतच्या फुटपाथवर झालेले अनधिकृत बांधकाम आणि पत्राशेड निष्कासित करण्यात आले. अतिक्रमण विभागातील उपअभियंता माने, कनिष्ठ अभियंता मोरे यांच्यासह धडक कारवाई पथकाद्वारे ही कारवाई करण्यात आली. यामध्ये ३ बीट निरीक्षक, १८ एम.एस.एफ जवान, २ पोलीस अधिकारी, १६ पोलीस कर्मचारी, ६ कंत्राटी मजूर कर्मचारी यांच्या उपस्थितीत तसेच १ जेसीबी, १ ट्रॅक्टर ब्रेकर या यंत्रसामग्रीचा वापर करून ही कारवाई करण्यात आली.

### इ क्षेत्रीय धडक कारवाई पथक सक्रिय

» इ क्षेत्रीय कार्यालयअंतर्गत प्रभाग क्र. ३, डुडुळगाव येथील १ अनधिकृत पत्राशेड बांधकामावर अंदाजे ६१६८ चौरस फूट क्षेत्रफळ असलेल्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. महापालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आणि इ क्षेत्रीय धडक कारवाई पथकामार्फत ही निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

शहर अभियंता मकरंद निकम यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रीय अधिकारी राजेश आगळे यांनी कार्यकारी अभियंता सूर्यकांत मोहिते, उपअभियंता राजेश जगताप, कनिष्ठ अभियंता संदीप वैद्य यांच्या अधिपत्याखाली महापालिका अतिक्रमण धडक पथक, ३ बीट निरीक्षक, २३ महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान, १ पोलीस उपनिरीक्षक, ५ पुरुष पोलीस, ४ महिला पोलीस, ५ मजूर यांच्या उपस्थितीत २ जेसीबी यंत्रांसह निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

# पुणे शहर वाहतूक कोंडीच्या विळख्यात!

## जागतिक पातळीवर चौथ्या क्रमांकावर : अहवालातून समीकरणच मांडलं

**पुणे | प्रतिनिधी**

जगात अनेक मोठ्या शहरांमधील वाढती वाहतूककोंडी सर्वांचीच डोकेदुखी ठरली आहे. जगभरातील प्रत्येक मोठ्या शहरात वाहनांची संख्या वाढल्याने कमी अंतर कापण्यासाठी खूप वेळ लागतो. अशातच 'टॉम-टॉम' या डॅनिश संस्थेने जगभरात केलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल आता समोर आला आहे. यामध्ये १० किलोमीटर हे अंतर कापण्यासाठी पुण्यात ३३ मिनिटं २२ सेकंद इतका अवधी लागत असल्याचे निरीक्षण या संस्थेने नोंदवले आहे.



यासंस्थेनुसार जागतिक वाहतूककोंडीत पुण्याचा चौथा क्रमांक लागला आहे. तर पहिल्या क्रमांकावर कोलंबियातील बरानकिला हे शहर आहे. तसेच दुसरा क्रमांकावर कोलकाता आणि तिसऱ्या क्रमांकावर बेंगळुरू शहर आहे.

जगभरातील विविध देशांच्या मोठ्या शहरांमधील वाहतूक कोंडीचे सर्वेक्षण करण्याचे काम 'टॉम टॉम' ही डच कंपनी करते. संस्थेने नुकताच २०२४ मध्ये जगभरातील वाहतूक कोंडीने ग्रासलेल्या शहरांची नावे, संबंधित शहरामध्ये १० किलोमीटरच्या प्रवासासाठी लागणार वेळ याचे सर्वेक्षण केलं आहे.

नेमकी या वाहतूक कोंडीचे कारण काय आहे आणि यावर उपाय काय असू शकतात? याबाबत वाहतूक तज्ज्ञांनी त्यांची मतं मांडली आहेत.परिसर संस्थेचे संचालक रणजित गाडगीळ यांच्या म्हणण्यानुसार, "वाहतुकीचे धोरण याला प्राधान्य देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सार्वजनिक वाहतुकीचा वापर विशेषतः शहरातील बस सेवा यांच्या संख्या वाढणे ही शहराची गरज आहे. रस्त्यावर खासगी वाहनांची संख्या कमी केले पाहिजे आणि सार्वजनिक वाहतूक वाढवली पाहिजे तसचं वाहतूक धोरणांची अंमलबजावणी त्यावर राज्यकर्त्यांनी सुद्धा तत्सम विचार करणे गरजेचे आहे."

वाहतूक तज्ञ प्रांजली देशपांडे यांनी सांगितले, "वाहतूक कोंडीची कारणे प्रामुख्याने खासगी वाहनांच्या संख्येत वाढ तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम नाही, हे आहेत. पण यावर उपाययोजना राबवणेसुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. पुणे शहरातील रस्त्यांची रूंदी वाढवणे, फुटपाथ चांगले करणे, सार्वजनिक वाहतूक वाढवणे, टाऊन प्लॅनिंग करणे, मेट्रोचे जाळे वाढवणे यासारख्या अनेक गोष्टी राबवले तरच कुठेतरी वाहतूककोंडी चा भार कमी होईल अशी अपेक्षा आहे."

एकीकडे पुणे शहराचा विस्तार चहू बाजूंनी होतो आहे. मेट्रोचे विस्तारीकरण, उड्डाणपुलांची कामं, रस्त्यावर पडलेले खड्डे यासारखी अनेक कारणं पुण्यातील वाहतूक कोंडीला जबाबदार आहे. त्यामुळे राज्यकर्ते यांच्यासह सामान्य नागरिकांनी सुद्धा आपल्या पद्धतीने वाहतूक कोंडी कशी कमी करता येतील हे पाहणं गरजेचं आहे. नाहीतर शहराच्या वाहतूक कोंडीच्या विळख्यात पुणेकर अडकला जाणार हे मात्र तितकेच खरं आहे.

### जगातील शहरात प्रति 10 किलोमीटर प्रवासासाठी लागणारा वेळ

- बरानकिला (कोलंबिया): ३६ मिन, ६ सेकंद
- कोलकाता: ३४ मिन ३३ सेकंद
- बेंगळुरू: ३४ मिन १० सेकंद
- पुणे: ३३ मिन २२ सेकंद
- लंडन: ३३ मिन १७ सेकंद

# पुण्यात फळभाज्यांची विक्रमी आवक

## राज्यासह परराज्यातून तब्बल 150 ट्रकमधून शेतमाल बाजारात दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

भोगी, संक्रांतीमुळे जास्त भाव मिळेल, म्हणून शेतकऱ्यांनी राखून ठेवलेला माल आणल्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी मार्केट यार्डात रविवारी (दि. 12) फळभाज्यांची विक्रमी आवक झाली. एरवी, रविवारी सरासरी 100 ट्रकमधून होणारी आवक तब्बल 150 ट्रकवर पोहोचली.



राज्याच्या विविध भागांसह परराज्यांतून ही आवक झाली. आवक वाढूनही मागणी जास्त असल्यामुळे भेंडी, पापडी, वालवर, पावटा, वांगी, गाजर, भुईमूग शेंगाच्या भावात 10 ते 20 टक्क्यांनी वाढ झाली आहे. तर मागणी आणि पुरवठा यातील समतोलामुळे उर्वरित सर्वच फळभाज्यांचे भाव मागील आठवड्याच्या तुलनेत स्थिर आहेत.

परराज्यांतून झालेल्या आवकमध्ये कर्नाटक, गुजरात आणि आंध्रप्रदेश येथून हिरवी मिरची सुमारे 14 ते 15 टेम्पो, कर्नाटक आणि गुजरात येथून कोबी 4 ते 5 टेम्पो, कर्नाटक येथून घेवडा आणि पावटा प्रत्येकी 4 ते 5 टेम्पो, आंध्रप्रदेश, तमिळनाडू येथून शेवगा 3 ते 4 टेम्पो, राजस्थान येथून 28 ते 30 ट्रक गाजर, कर्नाटक येथून 2 टेम्पो भुईमूग शेंग, मध्यप्रदेश येथून सुमारे 28 ते 30 टेम्पो मटार, तामिळनाडू येथून 1 टेम्पो तोतापुरी कैरी, मध्यप्रदेश येथून लसणाची सुमारे 14 ते 15 टेम्पो आवक झाली होती.

स्थानिक भागातून झालेल्या आवकमध्ये सातारी आले सुमारे 550 ते 600 गोणी, भेंडी आणि गवार प्रत्येकी 7 ते 8 टेम्पो, काकडी 8 ते 10 टेम्पो, कोबी 4 ते 5 टेम्पो, हिरवी मिरची प्रत्येकी 4 ते 5 टेम्पो, टोमॅटो 8 ते 10 हजार पेटी, फ्लॉवर 10 ते 12 टेम्पो, सिमला मिरची 10 ते 12 टेम्पो, तांबडा भोपळा 14 ते 15 टेम्पो, कांदा सुमारे 125 ट्रक, इंदौर, आग्रा, स्थानिक भागातून बटाटा 25 ते 30 टेम्पो आवक झाल्याची माहिती ज्येष्ठ आडतदार विलास भुजबळ यांनी दिली.

### पालेभाज्यांच्या भावात वाढ

- मार्केट यार्डात पालेभाज्यांची आवक मागील आठवड्याच्या तुलनेत स्थिर आहे. मात्र, भोगी आणि मकर संक्रांत असल्याने सर्व प्रकारच्या पालेभाज्यांच्या भावात मागील आठवड्याच्या तुलनेत 15 ते 20 टक्क्यांनी वाढ झाली आहे. बाजारात दाखल झालेल्या सर्व पालेभाज्यांची लवकर विक्री झाली आहे.